जिल्हा क्रीडा संकुलाचे परिरक्षण (लेखाशीर्ष २२०४ ५३१२) - जिल्हा / तालुका क्रीडा संकुल निधी वितरणास प्रशासकीय मान्यतेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः क्रीडायो-२३१८/प्र.क्र.१०/क्रीयुसे-१,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ मार्च, २०१८.

वाचा :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-२००३/(प्र.क्र.११/०३)/ क्रीयुसे-१, दिनांक २६ मार्च,२००३.
२. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-२००९/(प्र.क्र.२५/०९)/ क्रीयुसे-१, दिनांक २१ मार्च,२००९.
३. सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्रमांक-विजिताक्रीसं/ देदु/ निमा/ निवि/१७-१८/२५/का-९/०२४, दिनांक ०१ जानेवारी, २०१८.

प्रस्तावना :-

सध्याच्या क्रीडा संकुलाच्या योजनेनुसार विभागीय/जिल्हा/तालुका क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी अनुक्रमे २४००.०० लाख, ८००.०० लाख, १००.०० लाख याप्रमाणे अनुदान देण्यात येते. यानंतर या संकुलाच्या देखभालीसाठी द्यावयाच्या निधीची तरतूद, शासन निर्णय दिनांक २६ मार्च, २००३ मधील परिच्छेद-२ व ६ मध्ये खालील प्रमाणे आहे :-

अ.क्र.	संकुल	प्रथम वर्षाकरिता	द्वितीय वर्षाकरिता	तृतीय वर्षाकरिता
१	विभागीय क्रीडा संकुल	१५.०० लाख	१२.५० लाख	१०.०० लाख
२	जिल्हा क्रीडा संकुल	१०.०० लाख	७.५० लाख	५.०० लाख
३	तालुका क्रीडा संकुल	प्रतिवर्षी ३.०० लाख		

या योजनेत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.५००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे. यापैकी ८०% च्या मर्यादेत तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सन २०१७-१८ या वर्षाकरिता विभागीय क्रीडा संकुल, जिल्हा क्रीडा संकुल तसेच तालुका क्रीडा संकुल यांच्या देखभालीसाठी चालू आर्थिक वर्षात रु.५००.०० लक्ष अर्थसंकल्पीत आहे. त्यापैकी बांधकाम पूर्ण झालेल्या तालुका क्रीडा संकुलासाठी रु.३.०० लक्ष, अंतिम टप्प्यात असलेल्या तालुका क्रीडा संकुलासाठी रु.२.०० लक्ष व एक किंवा दोन क्रीडा सुविधा सुरु असलेल्या व बांधकाम सुरु असलेल्या

तालुका क्रीडा संकुलासाठी प्रत्येकी रु.१.६० लक्ष निधी सोबतच्या परिशिष्ट अ व ब मध्ये दर्शविल्यानुसार एकूण रु.३,०६,३२,९३०/- (रुपये तीन कोटी सहा लाख बत्तीस हजार नऊशे तीस फक्त) इतकी तरतूद वितरीत करण्यास व आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. याप्रमाणे संकुलांच्या देखभाल दुरुस्तीसाठी अनुदान वितरीत करताना खालील अटी व शर्ती लागू राहतील:-

(अ) प्रति वर्ष संकुल देखभालीसाठी प्रस्तावित केलेले अनुदान क्रीडा संकुलास प्राप्त होणारे उत्पन्न यातून येणारी तूट यापैकी किती रक्कम कमी असेल अशी रक्कम अनुदान म्हणून मंजूर करण्यात यावी.

(ब) संकुलाचा विमा उतरविताना प्रामुख्याने केंद्र शासनाचा उपक्रम असणा-या विमा कंपनीकडून संकुलांना विमा संरक्षण घ्यावे,

(क) या योजनेसाठी प्रत्येक आर्थिक वर्षात मिळणा-या अनुदानाचे वितरण शासन मान्यतेने करण्यात यावे.

३. सन २०१७-१८ मध्ये देखभाल दुरुस्तीकरीता उपलब्ध झालेल्या रु.५००.०० लक्ष एवढया तरतुदी मधून सोबतच्या परिशिष्ट अ व ब मध्ये नमूद जिल्हा / तालुका क्रीडा संकुलाच्या देखभाल व दुरुस्ती करीता सदर निधी वितरीत करण्यात यावा.

I. उपरोक्त देखभाल दुरुस्तीचा निधी आवश्यकतेनुसार मान्य निकषानुसार खर्च करण्यात यावा. ज्यावेळेस निधी प्रत्यक्ष खर्च करावयाचा त्याच वेळी आहरीत करावी. शासन लेख्याबाहेर बँक खात्यात हा निधी ठेऊ नये.

II. राज्य शासनामार्फत वेळोवेळी वित्त विषयक निर्गमित करण्यात आलेले विविध आदेश/नियम/ शासन निर्णय वित्तीय नियमावली यांची अंमलबजावणी करुन उपरोक्त वितरीत तरतूदीचा विनियोग करण्याच्या अधीन राहून उपरोक्त तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च मागणी क्रमांक ई-३, प्रधान लेखाशीर्ष २२०४, क्रीडा व युवक सेवा, १०४, क्रीडा व खेळ, (१६) (०३) जिल्हा क्रीडा संकुलांचे परिरक्षण (२२०४ ५३१२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखालील या वर्षाच्या उपलब्ध तरतूदीतून करण्यात यावा.

५. वित्त विभागाच्या दिनांक २४.०७.२०१५ च्या शासन परिपत्रकानुसार खालील बाबी नमूद करण्यात येत आहेत.

५.१) वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये ७०% निधी वितरणाचे अधिकार विभागास आहेत

५.२) सन २०१७-१८ या वर्षाकरिता जिल्हा क्रीडा संकुलांचे परिरक्षण याकरिता चालू आर्थिक वर्षात रु.५००.०० लक्ष अर्थसंकल्पीत आहेत.

५.३) यापूर्वी वितरीत केलेल्या अनुदानापैकी ७५% पेक्षा अधिक खर्च झाला आहे.

५.४) ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे त्या लेखाशीर्षांतर्गत १ वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५.५) दिनांक २४.०७.२०१५ च्या आदेशातील इतर मुद्दे या आदेशास लागू नाहीत.

५.६) उपरोक्त परिपत्रकातील “अ” व “ब” ची पूर्तता होत आहे.

६. वित्त विभाग दिनांक १८.०४.२०१७ व दिनांक २४.०७.२०१५ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतुद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

७. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक १८.०४.२०१७ च्या परिपत्रकातील सूचनांना अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील अटींची तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील मुद्दा क्र.१, २, ३, ४, ५, ६ व ७ मधील बाबी सदर आदेशास लागू नाहीत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१४१३१२४५५९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.14 13:14:54 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल तथा अध्यक्ष, आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजन समिती, मुंबई.

२. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

३. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.

४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.

५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
८. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
९. सर्व उपसंचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
१०. सर्व जिल्हा कोषाधिकारी (संचालनालयामार्फत)
११. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (संचालनालयामार्फत)
१२. वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई.
१३. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती (क्रीयुसे-१)

परिशिष्ट-अ

जिल्हा क्रीडा संकुल यादी सन २०१७-१८

अ.क्र.	जिल्हयाचे नांव	एकूण रक्कम	शेरा
१	मुंबई शहर	रु.५,००,०००/-	द्वितीय हप्त्यामधील रक्कम
२	परभणी	रु.५,००,०००/-	तृतीय व अंतिम हप्ता
३	हिंगोली	रु.५,००,०००/-	तृतीय व अंतिम हप्ता
४	बीड	रु.५,००,०००/-	द्वितीय हप्त्यामधील रक्कम
५	भंडारा	रु.३,२०,०००/-	प्रथम हप्त्यामधील शिल्लक रक्कम
एकूण		रु.२३,२०,०००/-	(अक्षरी रुपये तेवीस लाख वीस हजार फक्त)

परिशिष्ट-ब

तालुका क्रीडा संकुल यादी सन २०१७-१८

अ.क्र.	जिल्हा	अ.क्र.	तालुका	तालुकानिहाय देय अनुदान	जिल्हानिहाय देय अनुदान
१	२	३	४	५	६
१	मुंबई उपनगर	१	कुर्ला***	१,६०,०००/-	३,२०,०००/-
		२	अंधेरी***	१,६०,०००/-	
२	रायगड	३	रोहा*	३,००,०००/-	९,००,०००/-
		४	माणगांव*	३,००,०००/-	
		५	पेण*	३,००,०००/-	
३	नाशिक	६	इगतपुरी*	३,००,०००/-	२४,००,०००/-
		७	चांदवड*	३,००,०००/-	
		८	येवला*	३,००,०००/-	
		९	मालेगांव*	३,००,०००/-	
		१०	नाशिक*	३,००,०००/-	
		११	पेठ*	३,००,०००/-	
		१२	नांदगांव*	३,००,०००/-	
		१३	दिंडोरी*	३,००,०००/-	
४	धुळे	१४	साक्री**	२,००,०००/-	२,००,०००/-
५	जळगांव	१५	मुक्ताईनगर**	१,८५,०००/-	१,८५,०००/-

६	पुणे	१६	आंबेगांव*	३,००,०००/-	९,००,०००/-
		१७	बारामती*	३,००,०००/-	
		१८	खेड-राजगुरुनगर*	३,००,०००/-	
७	अहमदनगर	१९	संगमनेर*	२,८२,४००/-	४,८२,४००/-
		२०	कोपरगांव**	२,००,०००/-	
८	सोलापूर	२१	पंढरपूर*	३,००,०००/-	१०,२०,०००/-
		२२	अक्कलकोट**	२,००,०००/-	
		२३	मंगळवेढा***	१,६०,०००/-	
		२४	बार्शी***	१,६०,०००/-	
		२५	सांगोला**	२,००,०००/-	
९	सातारा	२६	फलटण*	३,००,०००/-	८,००,०००/-
		२७	कराड**	२,००,०००/-	
		२८	सातारा(जकातवाडी)*	३,००,०००/-	
१०	सांगली	२९	खानापूर-विटा*	१,५५,०००/-	१२,८५,०००/-
		३०	वाळवा***	१,६०,०००/-	
		३१	जत***	१,२०,०००/-	
		३२	शिराळा*	२,५०,०००/-	
		३३	मिरज**	२,००,०००/-	
		३४	तासगांव**	२,००,०००/-	
		३५	कडेगांव**	२,००,०००/-	
११	रत्नागिरी	३६	दापोली**	२,००,०००/-	३,६०,०००/-
		३७	खेड***	१,६०,०००/-	
१२	सिंधुदुर्ग	३८	वेंगुर्ला***	१,१०,०००/-	१,१०,०००/-
१३	औरंगाबाद	३९	पैठण***	१,६०,०००/-	८,२०,०००/-
		४०	गंगापूर**	२,००,०००/-	
		४१	सोयगांव***	१,६०,०००/-	
		४२	कन्नड*	३,००,०००/-	
१४	हिंगोली	४३	कळमनुरी*	३,००,०००/-	५,००,०००/-
		४४	औंढा(ना.)**	२,००,०००/-	

१५	जालना	४५	भोकरदन***	१,६०,०००/-	७,८०,०००/-
		४६	अंबड*	३,००,०००/-	
		४७	घनसांगवी***	१,६०,०००/-	
		४८	मंठा***	१,६०,०००/-	
१६	बीड	४९	धारुर**	२,००,०००/-	२,००,०००/-
१७	लातूर	५०	उदगीर***	१,६०,०००/-	१,६०,०००/-
१८	नांदेड	५१	लोहा*	३,००,०००/-	२४,६०,०००/-
		५२	अर्धापुर*	३,००,०००/-	
		५३	देगलुर*	३,००,०००/-	
		५४	किनवट*	३,००,०००/-	
		५५	कंधार**	२,००,०००/-	
		५६	नांदेड-सिडको*	३,००,०००/-	
		५७	मुदखेड*	३,००,०००/-	
		५८	मुखेड*	३,००,०००/-	
		५९	धर्माबाद***	१,६०,०००/-	
१९	नागपूर	६०	रामटेक***	१,६०,०००/-	१७,६०,०००/-
		६१	मौदा*	३,००,०००/-	
		६२	नरखेड***	१,६०,०००/-	
		६३	काटोल*	३,००,०००/-	
		६४	उमरेड***	१,६०,०००/-	
		६५	सावनेर**	२,००,०००/-	
		६६	कळमेश्वर***	१,६०,०००/-	
		६७	उत्तर नागपूर***	१,६०,०००/-	
		६८	कुही***	१,६०,०००/-	
२०	गडचिरोली	६९	अहेरी**	२,००,०००/-	८,६०,०००/-
		७०	सिरोंचा*	३,००,०००/-	
		७१	आरमोरी**	२,००,०००/-	
		७२	वडसा-देसाईगंज***	१,६०,०००/-	
२१	चंद्रपूर	७३	गोंडपिंपरी**	२,००,०००/-	७,७६,५३०/-
		७४	ब्रम्हपुरी**	१,१४,०००/-	

		७५	मुल***	८९,५३०/-	
		७६	वरोरा**	२,००,०००/-	
		७७	सिंदेवाही**	१,७३,०००/-	
२२	भंडारा	७८	लाखंदुर*	३,००,०००/-	१०,२४,०००/-
		७९	साकोली*	३,००,०००/-	
		८०	लाखनी*	२,६४,०००/-	
		८१	तुमसर***	१,६०,०००/-	
२३	गोंदिया	८२	आमगांव*	३,००,०००/-	२३,००,०००/-
		८३	देवरी*	३,००,०००/-	
		८४	सालेकसा*	३,००,०००/-	
		८५	तिरोडा*	३,००,०००/-	
		८६	गोरेगांव**	२,००,०००/-	
		८७	गोंदिया कामठा*	३,००,०००/-	
		८८	सडक अर्जुनी*	३,००,०००/-	
		८९	अर्जुनी मोरगांव*	३,००,०००/-	
२४	वर्धा	९०	आर्वी*	३,००,०००/-	९,००,०००/-
		९१	आष्टी*	३,००,०००/-	
		९२	देवळी*	३,००,०००/-	
२५	अमरावती	९३	अचलपुर*	३,००,०००/-	२४,००,०००/-
		९४	चांदुरबाजार*	३,००,०००/-	
		९५	चांदुररेल्वे*	३,००,०००/-	
		९६	धामणगांव रेल्वे*	३,००,०००/-	
		९७	मोर्शी*	३,००,०००/-	
		९८	दर्यापूर*	३,००,०००/-	
		९९	नांदगांव खंडेश्वर*	३,००,०००/-	
		१००	वरुड*	३,००,०००/-	
२६	अकोला	१०१	मुर्तिजापूर**	२,००,०००/-	५,१०,०००/-
		१०२	अकोट***	१,६०,०००/-	
		१०३	तेल्हारा***	१,५०,०००/-	

२७	यवतमाळ	१०४	केळापूर-पांढरकवडा*	३,००,०००/-	२१,००,०००/-
		१०५	उमरखेड*	३,००,०००/-	
		१०६	दारव्हा**	२,००,०००/-	
		१०७	पुसद*	३,००,०००/-	
		१०८	वणी**	२,००,०००/-	
		१०९	नेर**	२,००,०००/-	
		११०	राळेगांव*	३,००,०००/-	
		१११	आर्णी*	३,००,०००/-	
२८	बुलढाणा	११२	मेहकर*	३,००,०००/-	१८,००,०००/-
		११३	देऊळगांवराजा*	३,००,०००/-	
		११४	चिखली*	३,००,०००/-	
		११५	खामगांव*	३,००,०००/-	
		११६	सिंदखेडराजा*	३,००,०००/-	
		११७	मलकापूर*	३,००,०००/-	
एकूण				२,८३,१२,९३०/-	२,८३,१२,९३०/-

टिप :- १) * क्रीडा संकुल पूर्ण असलेले २) ** क्रीडा संकुल अंतिम टप्प्यात असलेले
३) * क्रीडा संकुल प्रगती पथावर असलेले.**

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.14 13:15:19 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन